नवशक्ती - दि. १०-१०-०४



## सृजनरंग

प्रा. मं. गो. राजाध्यक्ष

# झपाटलेले...

**एखाद्या ध्येयाचा ध्यास घेऊन ते साकार करणे हे ध्येयवादी व्यक्तींचे वैशिष्ट्य असते. प्रतिकूल परिस्थितीला वाकवून अल्पावधीत यश मिळविणे यातच कर्तबगारी सामावलेली असते. कलाक्षेत्रातील गो. कृ. देशपांडे यांचा या संदर्भातील लौकिक असाच आहे. त्यांनी औरंगाबादेत कलादालनाची निर्मिती केली, त्या विषयी.....**

मध्यंतरी माजी कलासंचालक व जागतिक कीर्तीचे चित्रकार माधवराव सातवळेकर यांची मुलाखत वाचनात आली. त्यामध्ये अगदी परखडपणे त्यांनी कलासंचालनालयाच्या उन्नतीऐवजी अधोगती झाल्याचे म्हटले आहे. काही वर्षांपूर्वी राज्यामध्ये सुमारे ४२ कला शाळा होत्या. त्या अचानक दीडशे ते पावणेदोनशे झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्या दृष्टीने कलासंचालनालयाची जराशी तपासणी झाली पाहिजे असे त्यांना वाटते. पूर्वी त्यांच्या कारकिर्दीत शिकवणारे शिक्षक उत्तम हवेत, म्हणून सातवळेकरांनी प्रा. आंबेरकर, निकम, दत्ता परूळेकर अशी कलाशिक्षणाविषयी विचार करणारी चांगली माणसे घेऊन रिफ्रेशिंग कोर्स घेतले. पण आता माणसांचा उपयोग केला जात नाही याबद्दल त्यांना वाईट वाटते.

महाराष्ट्रात अशा अनेक कला संस्था निघतात. कित्येक बंद पडतात. पण मराठवाड्यासारख्या भागात १९७१ पर्यंत कला महाविद्यालय नव्हते. तेथील जनतेची मागणीही होती. सर्व विद्यार्थ्यांना मुंबई किंवा पुणे येथे येऊन कला शिक्षण घ्यावे लागत असे. अशा वेळी अजिंठ्याच्या पार्श्वभूमीवर औरंगाबाद येथे शासकीय कलामहाविद्यालय सुरू करण्याचे शासनाकडून ठरले. मुख्यमंत्री होते वसंतराव नाईक व शिक्षण मंत्री मधुकरराव चौधरी. मंत्रालयात संबंधितांच्या बैठका झाल्या. महाराष्ट्राच्या चारीही विभागात अशा संस्था उभारण्याचे ठरले. १९७१ च्या जून महिन्यात औरंगाबाद येथे पहिली संस्था सुरू करण्याचे निश्चित झाले. कला संचालक माधवराव सातवळकर यांनी औरंगाबाद येथे जाऊन कला महाविद्यालयासाठी ज्या काही वस्तू तेथे उपलब्ध होण्यासारख्या होत्या, त्यापैकी किलेआर्क या टेकडीवरील 'जनाना महाल' ही वास्तू निवडली. पुढची पायरी होती तेथे लागणारा शिक्षक वर्ग, कार्यालयीन कर्मचारी वर्ग व ते कला महाविद्यालय सुरू करून त्याला एक दिशा देणारा संस्था प्रमुख - अर्थात प्राचार्य.

तेव्हा मुंबईचे जे. जे. कलामहाविद्यालय हेच प्रमुख होते. तेथील ज्येष्ठ प्राध्यापकांकडे विचारणा करताच सर्वांनी नकार दिला, तेव्हा वर्षभर निवृत्त होणारे कलानिरीक्षक श्री. पाटील यांचा विचार करण्यात आला. पण त्याच वेळी नागपूरहून मुंबईला आलेले एक प्राध्यापक गो.कृ. देशपांडे यांनी या सर्व घडामोडी जवळून पाहिल्या. शिक्षण क्षेत्राची आवड, अनुभव तसेच फुलब्राईट शिष्यवृत्तीवर अमेरिकेत घेतलेले उच्च शिक्षण या सर्व जमेच्या बाबी त्यांच्याकडे होत्या. त्यांनी शिक्षण सचिवांना आपल्याही नावाचा विचार करण्याची विनंती केली. तसेच सदर कला महाविद्यालय यशस्वी करण्याची महत्त्वाकांक्षाही त्यांनी व्यक्त केली. परिणामी १३ मे रोजी कला संचालकांनी देशपांडे यांना बोलावून त्यांना प्रभारी प्राचार्य नेमण्यात आले असून १५मे रोजी औरंगाबादला कामावर रुजू होण्यास सांगितले. त्याचबरोबर ही जबाबदारी त्यांनी स्वत:होऊन पत्करल्यामुळे आता तक्रारीला जागा नसल्याचे सांगून त्यांना सुयश चिंतिले. तसेच १५ जुलै १९७१ रोजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते संस्थेचे उद्घाटन ठरल्याचे सांगून कामात गती आणण्याचे सांगितले.

१६ मे रोजी देशपांडे औरंगाबादेत दाखल झाले व विभागीय शिक्षण संचालकांसोबत बसून त्यांनी सर्व माहिती घेतली. नंतर कला महाविद्यालयाच्या वास्तूकडे – जनानामहालकडे प्रस्थान केले. मोगलकालीन या बुलंद वास्तूमध्ये आधीच चेलीपुरा हायस्कूल होते. कला महाविद्यालयासाठी ठेवलेला त्या इमारतीचा भाग त्यांनी देशपांड्यांना दाखवला. त्याबरोबर एक आदर्श संस्था निर्माण करण्याचा विचार करून देशपांडे तेथे गेले होते व त्यांच्या डोळ्यासमोर 'जनाना महाल'चे जे रूप होते, ते ही वास्तू पाहून त्यांच्या डोळ्यासमोर काजवेच चमकले! शेजारच्या सायन्स कॉलेजचा रसायनशास्त्र विभाग तेथे पूर्वी होता, त्यामुळे भर दुपारी अंधार असलेल्या त्या जागेला कुबट दर्प येत होता. छताला वटवाघळे लटकत होती. खेळती हवा आणण्यासाठी भिंतीला एक खिडकी व मागील खोल्यांत प्रवेश करण्यास एक दरवाजा हवा होता. भिंतीची जाडीच तीन फुटांची होती. कुंपणाअभावी त्या जागेच्या आवाराचा उघडे शौचालय म्हणून वापर केला जात होता. त्यासाठी सर्वप्रथम आवाराला भिंत घालणे आवश्यक होते. शासकीय मंजुरीमध्ये केवळ रंगकाम, इलेक्ट्रिक फिटिंग व जुजबी फेरबदल एवढेच होते.

स्वतः ही जबाबदारी पत्करल्याने देशपांडे यांना भलतीच जोखीम जाणवू लागली. दुसऱ्या दिवशी त्यांनी सातवळेकरांशी दूरध्वनीवरून काही नवीन बांधकामांना तात्काळ मान्यता देऊन त्यांच्या कार्यालातील एक तडफदार व अनुभवी व्यक्तींस पाठवण्याची विनंती केली. सातवळेकरांना देशपांड्यांचा पूर्ण विश्वास असल्याने त्यांनी त्यांच्याशी संपूर्ण सहकार्य केले. ज्येष्ठ कर्मचारी तात्या महाजनी यांना तत्काळ पाठवले. बांधकाम खाते विद्युत खाते ह्या दोनही विभागांनी झपाट्याने काम करून, नवीन खिडक्या दरवाजे करून रंगकाम केले. 'जनाना महाल'चा संपूर्ण कायापालट केला.

त्या काळात महाराष्ट्रात वेळेवर पाऊस न आल्याने सर्वत्र दुष्काळाची छाया दाटली होती. मुख्यमंत्र्यांचे राज्यभर दौरे सुरु होते. त्यामुळे उद्घाटनाची तारीख १३ जुलैऐवजी १३ ऑगस्ट करण्यात आली. तो पर्यंत संस्थेसाठी लागणारे फर्निचर, साहित्य आदी बाकींची खरेदी होऊन शासकीय नियमाप्रमाणे १० जूनला वर्ग सुरु करण्यात आले. आलेल्या शिक्षकांनी स्वतःला वर्गकामामध्ये संपूर्णपणे झोकून दिले व विद्यार्थी कामाला लागले. जुलै महिनाही संपला. आकाशात रोज ढग येणे व जाणे एवढाच प्रकार सुरू होता. राहाण्यासाठी योग्य जागा मिळत नव्हत्या. शेजारच्या 'कामाक्षी' लॉजवर मुक्काम असल्यामुळे निदान अंघोळीला पाणी मिळे. बरेच विद्यार्थी बाहेरगावाहून आलेले असल्याने त्यांनाही पाण्याची व रॉकेलची टंचाई जाणवे. घरी स्वयंपाक करून महाविद्यालयात येत.